# राज्याच्या उपमुख्यमंत्री महोदयांना बीड जिल्हा सांभाळता येईना चालले नेतृत्व करायला ?





अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564





■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - १९५ ■ गुरुवार दि.३ एप्रिल २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 195 ■ Thursday Dt.3 April 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भ्रष्टाचाराची चौकशी करून चंद्रकांत बोराडेवर कारवाई करा

## बीड नगरपालिकेने अमृत अटल योजनेची वाट लावली

- बीड नगरपालिकेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांची बदली करा!
- राजकीय नेत्यांच्या वरदहस्तामुळे एजन्सी चालक व गुत्तेदार पोसले
- बीड जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा योजनेकडे लक्ष घाला!
- बीड जिल्हा दौऱ्यात दिलेले आश्वासन करून दाखवा!
- बीड जिल्हा सांभाळता येत नसेल तर पालकमंत्री पदाचा राजीनामा द्या?
- खाजगी बँकांच्या महाघोटाळ्यात उपनिबंधकांची बदली करा!
- जिल्हाधिकारी पाठक यांच्यावर चिडचिड करत पालकमंत्री यांनी निघून जाणे पसंत केले
- बीडमध्ये अजित दादांचा राष्ट्रवादीने गुन्हेगारीचा कळस घातला?
- बीड जिल्ह्याच्या विकास कामावर बारकाईने लक्ष घाला!

बीड । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार हे काल बीड जिल्हा दौऱ्यावर होते. तसेच त्यांनी सगळ्याच कारल्याची झाडाझडती घेतली आणि अधिकाऱ्यांना धारेवर धरले होते. परंतु बीड जिल्ह्याचा विकास हा शून्यच असल्याचा दिसत आहे. याकडे पालकमंत्री म्हणून अजित दादा यांनी लक्ष घातले पाहिजे. काला अजित पवार हे बीड दौऱ्यावर असताना काही आंदोलकांना कैद करण्यात आले होते. आंदोलकांना आणि पत्रकारांना पालकमंत्री अजित पवार यांनी वेळ दिला नसल्याने काही विषय मांडता आले नाही. तसेच बीड नगर परिषदेमध्ये कोट्यवधीचा घोटाळा असून याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. मुख्याधिकारी नीता अंधारे यांना निलंबित करून कारवाई होणे गरजेचे आहे. परंतु पालकमंत्री अजित पवार याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसत आहे. तसेच जिल्हा परिषद विभागात देखील भ्रष्टाचाराचा पाढा सुरूच आहे. याकडे देखील कानाडोळा होत आहे. बीड जिल्ह्यात निघरगट कर्मचारी अधिकारी यांचा सुळसुळाट झाला आहे. त्यांच्या माध्यमातून दलालांचे घरे मोठ्या प्रमाणात मोठ्या भरत आहे. याकडे देखील विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच बीड जिल्ह्यात खाजगी बँकांचा फोफावत आहे. खातेदारांसह ठेवीदारांचा लाखो रुपयांचा महाघोटाळा मल्टीस्टेट मल्टिपल निधी महिला अर्बन या बँकांनी केला आहे. दादा आपण पालकमंत्री म्हणून का संस्थाचालकांवर मोकोका लावणार का? बीड जिल्ह्याचा विकास हा लागेल तसा झालेला नसून यामध्ये फक्त स्वतःचीच व्वा-व्वा कशी होईल या माध्यमातून अधिकारी कर्मचारी तसेच काही राजकीय नेते काम करत आहे. हे कुठेतरी थांबले पाहिजे आणि जिल्ह्याचा विकास उत्कृष्ट पद्धतीचा झाला पाहिजे. भ्रष्ट अधिकाऱ्यांची खैर न करता त्यांना त्यांची जागा दाखवून द्या, बीड जिल्ह्यात हा भ्रष्ट कारभार कधी थांबणार असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. या भ्रष्ट अधिकाऱ्यांची तात्काळ बदली करावी, नसता अजित दादा आपण पालकमंत्री पदाचा राजीनामा द्या, अशी मागणी देखील काही नागरिकांकडून होत आहे.









जिल्ह्यात उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यांचा दौरा निव्वळ पोकळ ठरला असल्याचे दिसून येत आहे दादा नुसते आश्वासन देऊन चालणार नाही तर प्रत्यक्षात त्या कामाची कृती व्हायला हवीत. दादा बीड नगरपालिकेच्या वतीने आपण दौरा निश्चित केल्यावर स्वचछता मोहीम राबवली गेली नसता अस्वच्छतेचे प्रतीक ह्या बीड शहरात दिसून येत आहे.

तसेच गेवराई येथील छोट्या- मोठ्या ठेवीदारासंह खातेदारांचे या खाजगी बँकांनी मरण आणले आहे उपनिबंधक जिल्हा कार्यालयाकडून याप्रकरणी दुर्लक्ष केले जात आहे म्हणून या खाजगी बँकांच्या मनमानी कारभाराचा थोडासा आढावा घ्या. आणि सर्वांना न्याय मिळवून द्या. बीड नगरपालिकेत मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्या कार्यकाळाचा भ्रष्टाचारी डोंगर वाढतच चाललेला आहे त्यामुळे लेखापाल गणेश पगाऱ्यांचे धाडस निर्माण झाले आहे. भ्रष्टाचाराचा अड्डा म्हणून बीड नगर परिषद या कार्यालयाची लोकप्रियता झालीय. कोट्यवधी रुपयाचा मलिदा लाटण्याचे काम या दोन्ही महामेरूंकडून केली जाते. जिल्हा परिषद विभागामार्फत पाणीपुरवठा योजनेसाठी कोट्यावधी रुपये खर्च करूनही पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांमध्ये ओरड आहे. यामुळे अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांची तातडीने बदली करावी अशी मागणी होत आहे. पालकमंत्री म्हणून अजित दादा पवार आपण या विषयाकडे गांभीर्याने लक्ष घालणार का हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

तसेच सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये १०० कोटी पेक्षा जास्त घोटाळा आहे. संबंधित इंजिनियर चंद्रकांत बोराडे यांच्यावर निलंबनाची कारवाई करून विभागीय चौकशी पालकमंत्री म्हणून अजित पवार लावणार आहेत का? याकडे सर्वांचे लक्ष आहे. शिवाय अमृत अटल योजनेसाठी १२७ कोटी ची योजना ही बीडला पाणीपुरवठा करणारी आहे. आणि ती योजना सपशेल गेलेली आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागांमध्ये ५०० कोटीचा घोटाळा आहे. याकडे पालकमंत्री अजित पवार विभागीय चौकशी करून कारवाई करतील का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

बीड जिल्ह्यामध्ये कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार झालेला आहे बीड जिल्ह्यामध्ये दहा हजार कोटी रुपयांचा विविध कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांनी विसंगत करत राजकीय नेत्यांच्या वरदस्त लाभलेल्या एजन्सी यांना गुत्तेदारी देऊन कार्यकर्ते उपस्थित काम केलेल आहे. त्याकडे पालकमंत्री म्हणून अजित दादा

पान २ वर

## महामहीम राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्यासह ५ मंत्र्यांच्या उपस्थिती

# लोकशाहीचा लोकरत्न पुरस्कार सोहळा शाही थाटात होणार साजरा

## लोकशाही पत्रकार संघाच्या लोकरत्नसह विविध क्षेत्रातील राज्यस्तरीय पुरस्कारास प्रस्ताव पाठवावे : प्र. अ. प्रताप साळुंके

संभाजीनगर । प्रतिनिधी
लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने यावर्षी लोकरत्न, पुरस्कारासह विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या दिग्जांना राज्यस्तरीय समाजरत्न, कृषीरत्न, शिक्षणरत्न, उद्योगरत्न, सहकाररत्न, साहित्यरत्न, कलारत्न, क्रीडारत्न, आरोग्यरत्न, आदर्श पत्रकार, आदर्श पोलीस, आदर्श व्यक्ती, आदर्श ग्रामपंचायत, आदर्श शिक्षक, आदर्श प्राध्यापक, आदर्श शासकीय अधिकारी, आदर्श कॉन्ट्रॅक्टर, आदर्श वकील, आदर्श शाळा यांना राजस्थानचे राज्यपाल महामहिम हरिभाऊ नाना बागडे यांच्या हस्ते लोकरत्नसह विविध रत्न पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत, हा सोहळा संभाजीनगर येथील एकनाथ रंगमंदिर येथे करण्याचे आयोजित केले आहे. १९ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ३ वाजता हा पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहे.



या कार्यक्रमासाठी महामहीम राज्यपाल हरिभाऊ नाना बागडे, राज्याचे सामाजिक न्याय मंत्री मा. संजयजी शिरसाठ, कॅबीनेटमंत्री अतुलजी सावे, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, मा. पालकमंत्री तथा मंत्री खासदार सांदिपानजी भुमरे पाटील, माजी खा. इम्तियाज जलील, आ. प्रदीप जैस्वाल, आ. संदीप क्षीरसागर, आ. प्रशांत बंब, राष्ट्र संत रामगिरीजी महाराज, मराठवाड्यातील आय ए. एस./ आय पी एस अधिकारी यांचीही उपस्थिती राहणार आहे.

लोकशाही पत्रकार संघाने संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदिप जाधव, प्रदेशाध्यक्ष प्रतापराव साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या अनेक वर्षापासून कृषीरत्न, शिक्षणरत्न, उद्योगरत्न, समाजरत्न, सहकार, साहित्य, कला, क्रीडा, आरोग्य, पत्रकार, पोलीस, आदर्श व्यक्ती, आदर्श ग्रामपंचायत, आदर्श शिक्षक, आदर्श प्राध्यापक, आदर्श शासकीय अधिकारी, आदर्श कॉन्ट्रॅक्टर, यांना विविध पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ज्या आदर्श व्यक्तिमत्वांना यंदाचा लोकशाही पत्रकार संघाचा राज्यस्तरीय पुरस्कार २०२५ चा घ्यायचा असेल त्यांनी खालील मान्यवर कमिटीशी संपर्क साधावा.

भागवत वैद्य बीड ८४५९६९७३२८/ संदीप जाधव मुंबई ८७८८७३४४४०/ प्रताप साळुंके संभाजीनगर ७५८८१९७४०५ / गणेश जगदाळे नाशिक ९०७५० १७५०८/आयेशा मुलानी जालना ९८२२०२१८७५ / निलोफर शेख सिल्लोड ९१४६६ ५६५६३/ श्रद्धा कंडूडे पुणे ९२०९६५१००४/ जयश्री बस्ते नाशिक ९१६८७ ००१०९/ अयुब पठाण संभाजीनगर ८३२९५४६८५०/ पाटील शुभा पुणे ९८९०७ ९४६७० /महेबूब शेख परभणी ७२१८२५४२५२/ वसीम आजाद ९७३०४ २४३४३ /प्रभाकर पांडे नांदेड ९९७५०३४२०७/ बाजीराव गायकवाड धाराशिव ७०६६९ ५३८०८ /अनिस कुरेशी संभाजीनगर ९५४५४९३५४४ / अरिफ सय्यद नांदेड ९८६०८ २१५५२/ अंबादास सर सोलापूर ८८८८७७२५५३/नितीन जाधव लातूर ९८८१८ २८२३०/अस्लम खान जळगाव ९१४५१ ६१५८३/ गणेश चेडे अंबड +९१ ९५५२३ ०७६५२/संध्या सरोदे परळी ७७२१० ५३५०८/सुनील भोसले ९१४६२ ४१९५६/साजेद सय्यद बीड ९०२८९ ६७०६०/फैमीदा शेख रत्नागिरी ७६६६० १६८५२/ राणीताई झिंजूर्डे पाटील ८०१०६ ५३०२९ ज्यांना लोकरत्न, सह विविध पुरस्कारासाठी आपले नामनिर्देशित करायचे असेल त्यांनी कमिटीशी संपर्क साधावा असे आवाहन संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

## महसूल विभागाचा आगळावेगळा उपक्रम : जिवंत सातबारा मोहिम

बीड । प्रतिनिधी
महसूल व वनविभाग, महाराष्ट्र शासनामार्फत सातत्याने शेतकऱ्यांच्या हितासाठी व कल्याणासाठी वेगवेगळ्या योजना राबवण्यात येत असतात. त्यापैकीच एक म्हणजे 'जिवंत सातबारा मोहिम'. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या निर्देशानुसार ही मोहीम संपूर्ण राज्यामध्ये राबवण्याचा उपक्रम सध्या सुरु आहे. बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण बीड तालुक्यात ही जिवंत सातबारा मोहीम राबवण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सातबारा वरील सर्व मयत खातेदारांच्या नोंदीचे कामकाज पूर्ण करण्यासाठी बीड तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात जिवंत सातबारा मोहीम राबविली जात आहे.

कृती आराखडा :– महसूल व वनविभाग महाराष्ट्र शासनातर्फे १०० दिवसांचा कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे. त्या अंतर्गत दिनांक १ एप्रिल २०२५ ते ५ एप्रिल २०२५ पर्यंत ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांनी त्यांच्या सज्जा अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये चावडी वाचन करून (न्यायप्रविष्ठ प्रकरणे सोडून) गाव निहाय मयत खातेदार यांची यादी तयार करून घ्यावयाची आहे. सध्या जिल्हाभरात ग्राम महसूल अधिकारी यासाठी फिरत आहेत.

त्यानंतर दिनांक ६ एप्रिल २०२५ ते दिनांक २० एप्रिल २०२५ पर्यंत मयत खातेदारांच्या वारसांनी वारसा संबंधित आवश्यक कागदपत्रे (मृत्यू दाखला, वारसाबाबत सत्यप्रतिज्ञालेख, स्वयंघोषणापत्र /पोलीसपाटील / सरपंच / ग्रामसेवक यांचा दाखला, सर्व वारसांचे नावे, वय, पत्ते व मोबाईल नंबर तसेच रहिवासी बाबतचा पुरावा ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांच्याकडे सादर करावयाचे आहेत. ग्राम महसूल अधिकारी योग्य ती चौकशी करून मंडळ अधिकाऱ्यांमार्फत वारस ठराव करण्यात येईल. त्यानंतर दिनांक २१ एप्रिल २०२५ ते १० मे २०२५ पर्यंत ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांच्याकडून ई फेरफार प्रणालीमध्ये ऑनलाईन वारस फेरफार तयार करून महसूल अधिनियम १९६६ च्या विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून मंडळ अधिकारी यांच्या मार्फत वारस फेरफारावर निर्णय घेऊन त्यानुसार सातबारा दुरुस्त करण्यात येईल. जेणेकरून सर्व जिवंत व्यक्ती सातबारावर नोंदविल्या जातील. सातबारा उताऱ्यावर मयत शेतकऱ्यांचे नाव असल्यामुळे अनुदानाची केवायसी करणे व इतर कामांमध्ये अडचण येताना दिसत होती. या मोहिमेमुळे प्रत्येक वारसदारांना शासनामार्फत मिळणाऱ्या प्रत्येक योजनेचा लाभ मिळणे सोपे होणार आहे. त्याकरिता महसूल प्रशासन नेहमीच सज्ज आहे. येणाऱ्या काही दिवसात आपला सातबारा जिवंत होईल हे नक्कीच !

बीड तालुक्यामध्ये एकूण २३६ गावे, १६ मंडळे, ८८ सज्जे असे एकूण १२०६९० शेतकरी खातेदार आहेत. यातील मयत खातेदार यांची यादी बनवून सर्वांपर्यंत या योजनेची माहिती पोहोचवण्यासाठी बीड तालुक्याचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी धडाडीने प्रयत्न सुरु केले आहेत. गावोगावी जाऊन प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत योजनेची माहिती देण्यासाठी सर्व नायब तहसीलदार व मंडळ अधिकारी यांचे प्रयत्न सुरु असणार आहेत. ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांनी १ एप्रिल पासूनच ८ अ उताऱ्याचे चावडी वाचन सुरु केलेले आहे. जिवंत सातबारा मोहिमेसाठी शासनाने तहसीलदार यांची त्यांच्या तालुक्यासाठी समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे. तर संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे जिल्ह्याचे नियंत्रण अधिकारी म्हणून निवड केलेली आहे. याशिवाय संबंधित विभागीय आयुक्त त्यांच्या अधिनस्त जिल्ह्यांसाठी विभागीय संनियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. आयुक्त जिल्ह्यांचा नियमित आढावा घेऊन त्याबाबतचा साप्ताहिक अहवाल शासनाला सादर करणार आहेत. जिवंत सातबारा ही मोहीम सर्व शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त अशी मोहीम आहे. त्यामुळे मयतांची नावे सातबारा वरून कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी सुद्धा प्रतिसाद द्यावा, असे आवाहन बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे.

## धर्माच्या नावाखाली राजकारण करणाऱ्या व्यक्ती हि एक देशद्रोही : उषाताई चव्हाण

अंबाजोगाई । प्रतिनिधी
धर्माच्या नावाखाली राजकारण करणाऱ्या व्यक्तीला देशद्रोही म्हणून ओळखले जाईल आणि याची जिम्मेदार राज्य सरकारवर असेल कारण सरकार कुठल्याही पद्धतीचे ठोस निर्णय घेत नाही महाराष्ट्र मधील राज्यामधील वातावरण हे खराब होण्याचं कारण म्हणजे हे राज्य सरकार आहे असे मत डेमॉक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाच्या पदाधिकारी उषाताई चव्हाण यांनी व्यक्त केले.



पुढे त्या म्हणाल्या की,कोणत्या गोष्टी कुठे बोलावे याचा भान देखील सरकारला उरले नाही राज्यामध्ये महाराष्ट्रामध्ये अनेक असे प्रश्न आहेत जे चिंताग्रस्त आहेत वाढलेली महागाई असेल बेरोजगारी असेल हताश झालेली जनता, शेतकरी मायबाप असतील, पाण्याचे प्रश्न अनेक असे चिंताजनक विषय आहेत. राज्य सरकार या प्रश्नांवर काम न करता जाती धर्मावर काम करत आहे सर्वसामान्य नागरिकांन मध्ये मतभेद जातीवाद पसरवण्याचे काम करत आहे मला असं वाटतं भाजपाच्या नेत्यांनी कमीत कमी बोलत असताना ज्या मातीत उभारले आहेत त्या मातीकडे बघावे आणि फडकत असलेल्या त्या आपल्या तिरंगा कडे बघून बोलावे म्हणजे तुम्हाला हा भारत देश स्वराज्य या राज्यात असलेली जनता यांचा आदर वाटेल आणि कुठे राजकारण कसं करावं याचा भान येईल स्वतःच्या पोटाच्या खळख्या भरण्यासाठी सर्वसामान्य जनतेचा घात करत आहात तुम्ही लक्षात घ्या जनतेने तुमच्यावर ठेवलेला विश्वास त्याचा घात करत आहात तुम्ही खुर्ची आहे तोपर्यंत तुमचा ताल आहे. ज्यादिवशी खुर्ची जाईल त्यादिवशी जनता तुमची नसेल त्यामुळे राज्य सरकारने आपली जिम्मेदारी ओळखावी असेही चव्हाण यांनी सांगितले.

## शेख निजामच्या मागे राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी पूर्णपणे ताकतीशी पाठीशी राहील : उपमुख्यमंत्री अजित दादा पवार

बीड । प्रतिनिधी
बीड जिल्ह्यातील व शहरातील प्रगल्भ आणि अचूक राजकीय निर्णय घेण्याची क्षमता असलेल्या शेख निजाम यांनी शिवसेनेला सोडचिठ्ठी देऊन राष्ट्रवादीचे घड्याळ हाती बांधण्याचा निर्णय घेतला व त्यानिमित्ताने शेख निजाम यांचा पक्षप्रवेश व रमजान ईद निमित्त ईद–ए–मिलाप या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या पक्षप्रवेश व ईद–ए–मिलाप च्या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य श्री अजित दादा पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.




यावेळी प्रस्ताविक पर भाषणामध्ये शेख निजाम यांनी बीड शहरातील महत्त्वपूर्ण असलेल्या नवीन ईदगाह बालेपिर येथे सिमेंट कॉँक्रेट रस्ता व कॉँक्रिटीकरण, अल्पसंख्याक समाजातील मुलींकरिता मंजूर असलेले वस्तीग्रह च काम सुरू करणे, बीड जिल्ह्यात उर्दू घराची स्थापना करणे, इतर जिल्ह्याप्रमाणे बीड जिल्ह्यातील यूपीएसस एमपीएससीची तयारी करणाऱ्या अल्पसंख्यांक मुला मुलीं करिता स्टडी सेंटर व लायब्ररी स्थापित करणे, इस्लामपुरा ईदगाह येथे जागा अपुरी पडत असल्यामुळे बिंदुसरा नदी पात्रातील जागा उपलब्ध करून देणे, अल्पसंख्यांक बहुल भागात नियोजनबद्ध आराखडा तयार करून सदरील भागांचा नियोजनबद्ध विकास करणे आधी मागण्या उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या कडे केल्या या निमित्ताने उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शेख निजाम हे महत्त्वकांक्षी व्यक्तिमत्व असून त्यांनी केलेल्या मागण्या चा सकारात्मक विचार करून त्या पूर्ण करण्यात येतील त्याचा पाठपुरावा शेख निजाम यांनी करावा व या मागण्या लवकरात लवकर पूर्ण करण्यात येतील असे आश्वासन दिले व राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षात प्रवेश केल्याबद्दल एक निजाम व सहकार चे अभिनंदन करीत शेख निजाम सारख्या कार्यकर्त्यांची पक्षाला गरज असून राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष शेख निजाम यांच्या पाठीशी पूर्णपणे ताकतीशी उभी राहील असे म्हटले सदरील कार्यक्रमास मा आ. प्रकाश दादा सोळंके, मा. आ. अमरसिंह जी पंडित, आ. विजयसिंह पंडित, आ. सतीश जी चव्हाण, आ. विक्रम काळे, माजी आ. संजय दौंड जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण अँड गोरक्ष लोखंडे, राष्ट्रवादी ओबीसी सेल प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, योगेश क्षीरसागर, नारायण बप्पा शिंदे बळीराम गवते, बळी चव्हाण, प्रशिक्षित जाधव, अनुप मंत्री, संदीप पाटील, रितेश ढगे पाटील गोपाल धांडे, विजय चांदणे, सलीम शेख, समीर सय्यद, रईस चाऊस, सरपंच बिलाल पटेल, प्रज्ञाताई खोसरे, प्रियाताई डोईफोडे, शितलताई धोंडरे,लोकपत्रकार भागवत तावरे, अब्दुल वकील सर अस्लम अनवरी सर, नगरसेवक जैतुला खान, शेख इकबाल, रवींद्र कदम विनोद मुळूक, विलास विधाते, रमेश चव्हाण, सय्यद इलियास मुन्ना, इनामदार, रफिक नाशाद,यांच्या सह बीड शहरातील अनेक नगरसेवक मान्यवर व्यक्ती राष्ट्रवादी कॉँग्रेसचे पदाधिकारी सर्वसामान्य नागरिक व महिला वर्ग मोठ्या प्रमाणात आदी उपस्थित होते.

## लक्ष्मीकांत सौन्दत्तीकर यांची संस्कार भारतीच्या अध्यक्षपदी निवड

बीड । प्रतिनिधी



सा कला या विमुक्तये हा मुलमंत्र घेऊन कला, क्रीडा, संस्कार, संस्कृती, इतिहास या विषयात कार्य करणाऱ्या संस्कार भारती या संस्थेच्या बीड जिल्हाध्यक्ष पदी जेष्ठ रंगकर्मी लक्ष्मीकांत उर्फ बाळू सौन्दत्तीकर यांची निवड झाली आहे. आगामी काळात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्याचा मानस नूतन जिल्हाध्यक्ष सौन्दत्तीकर यांनी व्यक्त केला आहे. संस्कार भारती देवगिरी प्रांताची नुकतीच एक बैठक संपन्न झाली. गेल्या अनेक वर्षांपासून अविरतपणे बीड जिल्ह्यात मिळेल ती जबाबदारी पार पाडणारे लक्ष्मीकांत सौन्दत्तीकर यांच्याकडे जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी देण्याचा निर्णय एकमुखाने झाला. संस्कार भारती बीड जिल्हा कार्यकारिणी पुढीलप्रमाणे– संरक्षक –वासुदेव निलंगेकर, मार्गदर्शक –कुलदीप धुमाळे, अध्यक्ष –लक्ष्मीकांत सौंदत्तीकर, उपाध्यक्ष –श्रीमती प्रज्ञाताई रामदासी, सुरेश साळुंके, गणेश तालखेडकर, सौ मधुरा बाभुळगावकर, सचिव –सुरेश भानप, सहसचिव –अनिल रत्नाकरराव कुलकर्णी, गणेश स्वामी, कोषप्रमुख –संतोष पारगावकर, सहकोषप्रमुख –दत्तात्रय घोडके, महेश रामराव देशमुख, मंचीय कला संयोजक –प्रा. डॉ. राहुल पांडव, नृत्य –सौ.अनुराधा चिंचोलकर, संगीत –प्रकाश मानुरकर, नामदेव साळुंके, रत्नदिप त्रिंबकअप्पा शिगे, शैलेश पुराणिक, दृश्य कला संयोजक – केदारनाथ बहिरमल, भू अलंकरण –सौ.संगीता संदिकर साहित्य विधा संयोजक –प्रा.डी. एस. कुलकर्णी,साहित्य विधा सहसंयोजक प्रा. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, प्राचीन कला संयोजक, प्रा. जोगेंद्र गायकवाड, प्रचार व प्रसिद्धी प्रमुख दिनेश लिंबेकर, कार्यकारणी सदस्य, जगदीश पिंगळे, श्री.श्रीराम देशपांडे.

पान १ वरून...

### सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भ्रष्टाचाराची...

लक्ष देतील का? संबंधित प्रकरणाच्या तक्रारी शासन दरबारी धूळखात पडून आहेत त्यावर पालकमंत्री अजित पवार यांनी बोलणे गरजेचे आहे.

बीड जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी लपून जबाबदार आहे तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे अनेक गुन्हेगारी स्वरूपाचे अनेक कार्यकर्ते बीड जिल्ह्यामध्ये आज सुद्धा व्हाईट कॉलरने आलिशान गाड्यांमध्ये किलो दोन किलो सोनं घालून फिरत आहेत. सर्वात जास्त जर पाहिलं गेलं तर अजित दादांच्या राष्ट्रवादीनेच बीड जिल्ह्यामध्ये गुन्हेगारीचा कळस घातलेला आहे. अशी नागरिकांमध्ये चर्चा चालू आहे.

जिल्ह्यातील अनेक आंदोलकांचा आवाज दाबण्याचे काम काल अजित दादा पवार यांनी केलेला आहे. अनेक आंदोलकांना व निवेदन तक्रारी अधिकारी कर्मचारी यांच्या विरोधात घेऊन जाणाऱ्या समाजसेवकांना व सर्वसामान्य नागरिकांना निवेदन स्वीकारतात अजित दादा यांनी काल पोलीस प्रशासन व जिल्हा अधिकारी कार्यालयातील जिल्हाधिकारी यांच्यावरती ताशेरे उडत चिडचिड करत निघून जाणे पसंत केले. यामुळे अनेक विषयांच्या तक्रारी आंदोलकांना देता आल्या नसल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे.

# संवेदनशील कामगिरी करणारा सच्चा संपादक अमीन भाई शेख!

## ग्रामीण भागातून संपादक पदापर्यंत यशस्वी कार्यकीर्द; जिद्दीच्या बळावरसिटी लाईफची स्थापना

संपादक शेख अमीन हे पत्रकार क्षेत्रात काम करत असून त्यांचे कार्य खूप संवेदनशील आहे. साप्ताहिक बीड सिटी लाईफ या वृत्तपत्राचे संपादक आहेत. गेल्या अनेक वर्षापासून पत्रकार क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

२०१४ पासून पत्रकार क्षेत्रात काम करत असून, दैनिक सिटीजन या वृत्तपत्राचे उमापूर प्रतिनिधी म्हणून काम करत होते. त्यानंतर २०२१ पासून त्यांनी स्वतः संपादक होण्याची जिद्द पूर्ण केली. या जिद्दीच्या जोरावर बीड सिटी लाईफ या वृत्तपत्राच्या माध्यमातून गोरगरिबांसाठी अन्यायाविरुद्ध भ्रष्टाचार विरुद्ध निर्भीडपणे आवाज उठवणे न्याय मिळवून देण्याचे काम करत आहे.




गेवराई तालुक्यामध्ये 'सिटी लाईफ' हे नाव आता एक ब्रँड झाले आहे. सिटी लाईफ म्हणजेच 'नागरिक' आणि आमच्यासाठी प्रत्येक नागरिक हा 'बीड सिटी लाईफ' आहे. नेमका हाच विचार संपादक शेख आमीनभाईंनी जपला,सांभाळला आणि वाढविला. त्यामुळेच आज प्रत्येकाला' सिटी लाईफ आपला वाटतो. अतिशय शून्यातून पुढे आलेल्या आमीनभाईंनी मुळात पेपरच का काढला ? हा प्रश्न साधारण ३ वर्षांपूर्वी विचारला जात होता. चार दिवस चालविल आणि बंद करील असे टोमणेही ऐकायला मिळायचे. साहजिकच कोणी काही नवीन करतंय म्हटल्यावर फुकटछाप चर्चा आणि टोमण्याचा बाजार भरणारच यात नवल काही नव्हतं. त्याला कारणही तसंच होतं, आमीनभाईंनी पेपर चालू केला तो अंत्यत गरिबीत. पेपरला एव्हढा पैसा लागतो हे पेपर काढल्यावरच कळालं. आता माघारी फिरायचे नाही असं ठरवून आमीनभाईंनी जिद्दीनं एक तप म्हणजेच ३ वर्ष संघर्ष केला. वाचकांनीही त्यांचा विचार डोक्यावरच नाही तर डोक्यात घेतला. त्यामुळेच आज 'सिटी लाईफ' आणि आमिनभाई हे नाव प्रत्येकाच्या तोंडात आहे. आमीनभाईनीही त्या विचाराला कधीच तडा जाऊ दिला नाही. सर्वसामान्य लोकांच्या शब्दाला इथं किंमत आहे, म्हणूनच लेखणीला धार लावण्याची हिंमत आमीनभाईंनी केली. संपादक म्हणून कधी मिरवा मिरव केली नाही. मोठेपणाचा कधी आव आणला नाही. मैं बड़ा हे त्यांनी कधीच जाणवू दिलं नाही. अधिकार गाजवणं त्यांना कधी जमलं नाही आणि जमणारही नाही. लहान मोठा असा भेद त्यांना कधी स्पर्शही करू शकणार नाही त्यांच्यासाठी सगळे सारखेच बीड सिटी लाईफ म्हणजेअभिष्टचिंतन ४ एप्रिल

आपण सर्वच ही भावना त्यांनी जपली. त्यामुळेच आजही इथला प्रत्येकजण 'संपादक' आहे. मालक कोणालाही होता येतं, मालकी हक्क देखील कोणीही गाजवू शकतं. पण जिवाभावाचा मालक होणं आणि प्रेमाचा, स्नेहाचा मालकी हक्क गाजवणं हे प्रत्येकालाच जमत नाही मात्र आमीनभाई ते जमवलं आणि पेपर मधून हेच तर कमवलं. 'सिटी लाईफ' मध्ये आज जिवाभावाची टीम त्यांनी ऊभी केली ती उगीच नाही. जीव लावला, लळा लावला म्हणूनच माणसाला माणसं जुळत गेली. त्यामुळेच आज बीड सिटी लाईफ अपडेट' आहे.आपली सावली निर्माण करायची असेल तर ऊन झेलण्याची तयारी असावी लागते याची जाणीव ठेवूनच आमीनभाईंनी अनेक संकटातून वाट शोधली. हळूहळू व्याप वाढला, माणसं वाढली, एक से एक व्यक्ती जोडल्या गेल्या. काही नवे विचार पुढे आले आणि त्यातूनच एक सामान्य नागरिक, एक उत्तम संपादक असलेल्या आमीनभाईंच्या कार्याला व्यवहारिकतेचं बळ मिळालं. तिथेही त्यांनी आपल्या कार्याची छाप सोडत 'मॅनेजमेंट गुरू' काय असतं हे दाखवून दिलं. व्यवहारातच नव्हे तर समाजातील अनेक प्रश्नांच्या बाबतीत त्यांची असलेली कमांड खरोखरच उल्लेखनीय आहे. ऑल राऊंडर परफेक्ट असलेले आमिनभाई शेख आजही सामान्यच आहेत. तोच स्वभाव, तोच विचार, तीच ताकद आणि तितकीच विश्वासार्हता कायम आहे आणि इंशाअल्लाह राहील !

हवाओं के भरोसे मत उड़, चट्टाने तूफांस का भी रुख मोड़ देते, आपल्या पंखांवर भरोसा ठेव, हवाओं के भरोसे तो पतंगे उड़ा करती है याप्रमाणे नेहमी मेहनतीतूनच विश्वास, जिद्द आणि यश शोधण्याच्या प्रयत्न करणाऱ्या आमीनभाईंनी घेतलेली भरारी आकाशाला गवसणी घालणारी आणि प्रत्येकाच्या काळजाला भिडणारी आहे. त्यांचा हा दैदिप्यमान प्रवास एक सच्चा' सिटी लाईफ' म्हणून यापुढेही असाच मैलोमैल सुरूच राहो आणि यशाचा मेगा हायवे' समृध्दी' च्या दिशेने वेगाने होत राहो हीच अल्लाहकडे वा ....!

संपादक, सहकारी मित्र आणि एक भाऊ म्हणून त्यांच्याशी लागलेला लळा वर्षानुवर्षे वाढतच आहे आणि इंशाअल्लाह वाढतच राहील. समाजभान असलेल्या, समाजमन राखणाऱ्या आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या आमीनभाईंचे मनःपूर्वक शुभेच्छा आणि या अभिष्टचिंतनाच्या निमित्ताने शुभेच्छा..!!

**शब्द संकलन**
**नवनाथ आडे, गेवराई**
**मो, ९०७५९१३११४**

# उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या शुभहस्ते ऑलिव रेस्टॉरंट अँड बॅन्क्वेटचे उद्घाटन

बीड । प्रतिनिधी

बीड शहराच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या ऑलिव रेस्टॉरंट अँड बॅन्क्वेट्सचा दिमाखदार उद्घाटन सोहळा बुधवार दि.२ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता नगर नाका येथे आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या शुभहस्ते फीत कापुन ऑलिव्ह रेस्टॉरंट चे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्तविक प्रतिक भोपळे यांनी केले. यावेळी नगर नाक्यावर बीडची मुंबई अवतरली आहे असे सांगत. ऑलिव रेस्टॉरंट अँड बँक्वेट सेवेत दाखल होत असल्याचा आनंद व्यक्त केला. माझ्या संकल्पनेतील हे प्युअर व्हेज रेस्टॉरंट पुणे मुंबई सारख्या मोठ्या शहरातील हॉटेलची मजा आता बीडकर घेऊ शकणार आहेत. यामध्ये तळ मजल्यावर फास्ट फूड सेंटर, दुसऱ्या मजल्यावर एसी बँक्वेट हॉल, तर तिसऱ्या मजल्यावर रूफटॉप रेस्टॉरंट अँड एसी डायनिंग हॉल ग्राहकांसाठी उपलब्ध असणार आहे. लहान मुलांना विरंगुळा म्हणून टेरेस गार्डन ची सुविधा या ठिकाणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले. ग्रीक थीम वापरून या हॉटेलची उभारणी करण्यात आली असून ही बीडकरांसाठी एक मेजवानी ठरणार आहे असे इंजि. प्रतीक भोपळे यांनी आपल्या प्रस्ताविकात सांगितले.

ऑलिव रेस्टॉरंट ड बॅन्क्वेट्सच्या भव्य दिव्य उद्घाटनाच्या अनुषंगाने शुभेच्छा देताना उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार म्हणाले कि, बदलत्या सामाजिक परिस्थिती प्रमाणे बीड शहर सुद्धा नव्या गोष्टी स्विकारत आहे. आज जगभर विविध खाद्य संस्कृतीचे भव्य रेस्टॉरंट निघत आहेत. त्या सर्व रेस्टॉरंटचा अभ्यास करून तरुण उद्योजक प्रतीक भोपळे याने अभियांत्रिकी पदवी मिळवल्या नंतर सुद्धा नोकरीच्या मागे न लागता रेस्टॉरंट क्षेत्राचा अभ्यास करून बीड



शहरातील खवय्यांसाठी जागतिक बदलाचा विचार करून हेल्दी, रुचकर, स्वादिष्ट खाद्य पदार्थ बीड शहराच्या ऑलिव रेस्टॉरंट ड बॅन्क्वेट्सच्या माध्यमातून देण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. प्रतिकने ऑलिव रेस्टॉरंट आणि बॅन्क्वेट्सचे इंटेरियर डिझाईन ग्रीक देशातील पध्दतीने केले आहे. त्यामुळे बीड शहरातील नागरिकांना पुणे मुंबई सारख्या शहरांमध्ये जाण्याची आता गरज पडणार नाही असे असे अजित दादा यांनी सांगितले. प्रत्येक व्यवसायामध्ये आत्मविश्वास अतिशय महत्त्वाचा असतो कारण आत्मविश्वासामुळे यशाचा मार्ग सुखकर होतो आणि हा आत्मविश्वास प्रतिक भोपळे या युवकाला त्याच्या आई-वडिलांकडून मिळाला आहे. प्रत्येक उद्योग हा यशस्वी होत असतो पण त्या उद्योगांमध्ये संपूर्णतः झोकुन दिलं पाहिजे तरच यश पदरी पडते असे ना.अजित दादा पवार उद्घाटन प्रसंगी सांगितले. याप्रसंगी ना.पंकजाताई मुंडे, फुलंब्रीच्या आ.अनुराधाताई चव्हाण यांनी प्रतिक भोपळे यांना शुभेच्छा देत आपले मनोगत व्यक्त केले.

या उद्घाटन प्रसंगी उद्योजक भरत गीते, डॉ.हनुमंत भोसले, स्व.धुंडीराज महाराज पाटांगणकर उत्तराधिकारी तथा सुपुत्र पाटांगणकर संस्थांचे मताधिपती ह.भ.प. विनायक महाराज पाटांगणकर, माजी मंत्री सुरेश नवले, डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर, रिपाईचे युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, सर्जेराव तांदळे, संतोष हांगे, अदित्य सारडा, शुभम धुत, शुभम कांतागळे माजी नगरसेवक सुभाष सपकाळ, विनोद मुळूक, रणजीत बनसोडे, प्रा.प्रदीप रोडे, रावसाहेब उणवणे, आर्किटेक अजय नाईकवाडे, महेश पवार यांच्यासह समाजातील सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक, शैक्षणिक आणि विविध क्षेत्रातील उद्योजकांनी नागरिकांनी, अधिकारी आणि प्रतिनिधींनी यांनी आवर्जून उपस्थिती दर्शविली. आलेल्या सर्व पाहुण्यांचे स्वागत विश्वनाथ रावजी भोपळे, इंजि.राजेंद्र भोपळे, इंजि.प्रतीक भोपळे, आकाश वाघमोडे यांच्यासह भोपळे-वाघमोडे परिवारातील महिला यानिपस्थितांचे स्वागत केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन निवेदक सुरेश साळुंके यांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांचे आभार ऑलिव रेस्टॉरंट अँड बँक्वेटचे एम.डी.संजय धुरंधरे यांनी मानले. ऑलिव्ह रेस्टॉरंट अँड बँक्वेट मध्ये डायरेक्टर विजय मिश्रा, मॅनेजर अमरजीत दास, एक्झिक्युटिव्ह शेफ वीरसिंग यांच्यासह ५० जणांचा स्टाफ काम पाहणार आहे.



बीड : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या उपस्थितीत निजाम सरकार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये इमरान नबी यांचा अधिकृत पक्ष प्रवेश झाला.

# सार्वजनिक बांधकाम विभागातील शेख शफीभाऊ यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार समारंभ

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेशचे भुमिपुत्र शेख शफीभाऊ शेख अब्दुल हे नियत वयोमानानुसार पाटोदा सार्वजनिक बांधकाम विभाग येथुन निवृत्त झाले असुन आज दि.०३ गुरुवार रोजी ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामपंचायतीच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन हृद्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते. कार्यक्रमाची प्रस्तावना व सुत्रसंचलन भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांनी केले. शेख शफीभाऊ यांचे वर्गमित्र निवृत्त अभियंता गणपत तागड यांनी तसेच पत्रकार हरीओम क्षीरसागर, माजी सरपंच बाळासाहेब मुळे, ग्रामपंचायत सदस्य शेख समीर, रमेश गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

डॉ.गणेश ढवळे यांनी शेख शफीभाऊ यांनी केलेल्या सेवेचा व त्यांच्या



कार्याचा गुणगौरव करीत असताना त्यांच्या सेवानिवृत्ती नंतरचा काळ सुखी, समृद्धी, आनंदाने जावो व त्यांना निरोगी दीर्घायुष्य लाभो यासाठी शुभेच्छा दिल्या. सत्कारमूर्ती शेख शफीभाऊ यांनी सत्काराला उत्तर देताना सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद तालुक्यातील भोकरदन सार्वजनिक बांधकाम उपविभाग याठिकाणी २६ वर्षे सेवा केल्यानंतर १५ वर्षे बीड जिल्ह्यातील पाटोदा याठिकाणी ३१ मार्च रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती झाल्याचे सांगताना शासकीय नोकरी करत असताना गावच्या मातीची ओढ, त्यांना आलेले अनुभव कथन केले. ग्रामपंचायत मार्फत करण्यात आलेल्या सत्कार समारंभाबद्दल सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांचे आभार मानले. यावेळी शुभेच्छा देण्यासाठी माजी सरपंच राजेभाऊ गिरे, संदिप मंडलिक, बाळकृष्ण थोरात, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, महादेव कुदळे, अशोक जाधव, अँड. गणेश वाणी, संतोष भोसले, अशोक वाणी, दादा गायकवाड, शेख खाजु, सय्यद रफिक, शेख अकबर मिस्त्री, आरूण ढवळे, राजेंद्र ढास, अमोल जाधव, राजेभाऊ आगवान आदि ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# एमटीएस ओलंपियाड परीक्षेत सरस्वती प्राथमिक विद्यालयाचे यश



धारूर । प्रतिनिधी

धारूर शहरातील शैक्षणिक क्षेत्रामध्ये अग्रस्थानी असलेल्या व सर्वात जुन्या सरस्वती प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ऑलिंपियाड एमटीएस स्पर्धा परीक्षेमध्ये घवघवीत यश मिळवले आहे. या स्पर्धा परीक्षेत विद्यार्थ्यांनी ट्रॉफी, गोल्ड मेडल, सिल्वर मेडल, ब्रांच मेडल असे विविध प्रकारचे मेडल मिळवून राज्याच्या जिल्ह्याच्या व केंद्राच्या गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार मुख्याध्यापक तुकाराम डोंगरे तसेच सर्व शिक्षकांचे उपस्थितीमध्ये करण्यात आला.

एमटीएस ओलंपियाड स्पर्धा परीक्षा ५ जानेवारी रोजी झाली होती. त्याचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. त्यात सरस्वती प्राथमिक विद्यालयाच्या पुढील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे. इकरा मोसीन मुलानी- गोल्ड मेडल, वेदिका अशोक बोराडे - गोल्ड मेडल, सय्यद उमेर जिलानी- गोल्ड मेडल, जय महेश घोळवे -सिल्वर मेडल, वंश पढियार - सिल्वर मेडल, स्वराज नितीन काळे -सिल्वर मेडल, आराध्या किशोर बोराडे -उत्तीर्ण समर्थ बालाजी मुळे -उत्तीर्ण, शिवण्या दत्तात्रय जाधव -उत्तीर्ण श्लोक बाबासाहेब फावडे -उत्तीर्ण. या विद्यार्थ्यांनी यश मिळवले यानिमित्त प्राथमिक शाळेच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. मुख्याद्यापक तुकाराम डोंगरे, सहशिक्षक अमर शुक्ला, गणेश वरकले, रवी कुंभार, अशोक तळस्कर, विजय काळे, उषा मुंडे मॅडम, ज्योती काळे मॅडम, आदर्श नवोदय तज्ञ शिक्षक नाथा ढगे इत्यादींनी अभिनंदन करून विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

# चौसाळा येथिल हजरत चंदन शहावली यात्रेस मोठया संख्येने उपस्थित रहा : कुचेकर, कळासे

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पावसाळा येथील हिंदू मुस्लिम एक्याचे प्रतिक असलेल्या हजरत चंदन शहावली बाबा या देवस्थान यात्रेस प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी मोठया उत्साहात दिनांक ०३ / ०४/२०२५ रोजी पासुन प्रारंभ होत असुन यात्रेनिमित्त भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे तरी चौसाळा व पंचक्रोशीतील जनतेने मोठया संख्येने उपस्थीत रहावे असे आवाहन हजरत चंदन शहावली यात्रा कमिटी अध्यक्ष अंकुश कळासे व उपाध्यक्ष पवन कुचेकर यांनी केले आहे.





दिनांक ०३/०४/२०२५ रोजी संदल निमित्त रात्री ब्रास बँडचा मुकाबला होणार आहे दिनांक ०४/०४/२०२५ सांस्कृतिक कार्यक्रम व संध्याकाळी नऊ वाजता शोभेची दारूचा कार्यक्रम होणार आहे तसेच दिनांक०४/०४/२०२५ रोजी ०९ ते१२ साई स्किन हॉस्पिटल तर्फे मोफत त्वचारोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे दिनांक ०५/०४/२०२५ रोजी दुपारी०२ ते०६ कुस्त्यांची दंगल व शेवटची कुस्ती ११११११ होणार आहे तसेच बुधवार दिनांक०९/०४/२०२५ रोजी ह. भ. प. शिवलीला ताई पाटील यांचे हरिकीर्तन होणार आहे तरी चौसाळा व पंचक्रोशीतील जनतेने या भरघोस कार्यक्रमाचा आनंद घ्यावा असे आवाहन हजरत चंदन शहावली यात्रा कमिटी अध्यक्ष अंकुश कळासे व उपाध्यक्ष पवन कुचेकर यांच्यासह सर्व कमिटी व चौसाळाकार ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# उद्योग क्षेत्रात नवनवीन संकल्पना राबविणारे ॲल्युमिनियम मॅन भरत गिते यांना राज्यस्तरीय लोकाशा भुषण अवार्डने सन्मान

## पालकमंत्री ना.अजितदादा पवार व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते वितरण

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

ॲल्युमिनियम मॅन भरत गीते हे भारताला ॲल्युमिनियम उद्योगाचे जागतिक केंद्र बनवण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यांची दूरदृष्टी निव्वळ व्यवसायापलीकडेही जाते. विकास, शिक्षण आणि देशाच्या विकासाप्रति त्यांची सखोल बांधिलकी आहे. उद्योग क्षेत्रात वेगळी भूमिका ओळख निर्माण करणारे परळीचे भूमिपुत्र ल्युमिनियम मॅन भरत केशवराव गिते यांना बीड येथे आयोजित कार्यक्रमात राज्यस्तरीय लोकाशा भुषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार, मंत्री ना.पंकजाताई मुंडेंच्या प्रमुख उपस्थिती भरत गित्ते यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. दरम्यान ल्युमिनियम मॅन भरत गिते म्हणाले की, संत ज्ञानेश्वर यांनी म्हटल्याप्रमाणे इवलेसे रोप लावलेल्या द्वारी । त्याचा वेलू गेला गगनावरी ।। या उक्तीप्रमाणे माझे कार्य सुरू आहे. या पुरस्काराने माझी जबाबदारी व मला नवी उमेद देणारा आहे. येणाऱ्या काळात उद्योग क्षेत्रात नवनवीन संकल्पना राबवून नविन्य पूर्ण दृष्टीकोण उत्कृष्ट नियोजन, रोजगार यासाठी योगदान देणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच वडिलांचे उत्तम संस्कार आपल्यावर झाल्यामुळे आपले जीवन सुखी व समृद्ध झाले आहे. त्यामुळेच आपण इथपर्यंतचा प्रवास करू शकलो हे उपकार कधीच फिटणार नाही. शेतकरी कुटुंबामध्ये जन्म होऊन पण, शिक्षणाचे महत्व जाणणारे व ज्यांच्याकडून उद्योगाचे बाळकडू घेतले असे माझे स्वर्गीय वडील केशवराव गिते यांना हा बहुमान समर्पित करतो असे ते म्हणाले. दरम्यान उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्याकडून भरत गिते यांच्या उद्योग क्षेत्रातील कार्याचे भाषणातून केले तोंडभरून कौतुक करत अभिनंदन केले. बीड येथे लोकाशाच्या वर्धापन दिनानिमित्त दि.३१ मार्च ते २ एप्रिल दरम्यान लोकाशा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. लोकाशा महोत्सवाचा समारोप राज्याचे उपमुखमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार आणि पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. तसेच याच सोहळ्यात राज्यातील नवरत्नांना लोकाशा भुषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये उद्योग क्षेत्रात केलेल्या योगदानाबद्दल तौरल इंडिया प्रायव्हेट.लि. कंपनीचे एमडी तथा सीईओ आणि उद्योग जगतात आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक करणाऱ्या उद्योजक तथा परळीचे भूमिपुत्र ल्युमिनियम मॅन भरत केशवराव गिते



यांना लोकाशाच्या वर्धापन दिनानिमित्त दिला जाणारा राज्यस्तरीय नवरत्न लोकाशा भुषण पुरस्कार ना.अजितदादा पवार आणि ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप प्रत्येकी एक लक्ष रुपये रोख, सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह असे होते. भरत गिते यांनी उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करुन कामगिरी केली आहे. यापूर्वी ही त्यांनी केलेल्या उद्योग क्षेत्रातील कार्यामुळे याआधी बऱ्याच राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानीत झालेले आहेत. भारतीय उत्पादन क्षेत्रात जागतिक पातळीवरील सर्वोत्तम पद्धतींचा समावेश केलेला असून, मेक इन इंडियात योगदान दिले.तौरल इंडिया हे ल्युमिनियम कास्टिंग सोल्युशन्स मध्ये जागतिक पातळीवर आघाडीवर गेले आहे. औद्योगिक क्षेत्रात ५०० कोटींची गुंतवणूक आणि १,२०० रोजगार निर्मिती यासाठी एका आंतरराष्ट्रीय कंपनीचा प्रमुख म्हणून महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांबरोबर सामंजस्य करार केला. हा क्षण प्रत्येक परळीकरासाठी अभिमानाचा ठरला. सामंजस्य करार यामुळे स्थानिक युवकांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून, राज्यातील औद्योगिक विकासाला नवी चालना मिळेल. राज्याच्या औद्योगिक आणि आर्थिक प्रगतीला गती मिळणार आहे. त्यांनी उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत लोकाशाच्या वर्धापन दिनानिमित्त यावर्षीचा महत्वाचं हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. या पुरस्कार सोहळ्यास उद्योगपती शांतीलालजी मुथ्था, ओमप्रकाशजी चांडक, अभिनेता शयाजी शिंदे, आरोग्यदुत ओमप्रकाश शेटे, अँकर विलास बडे, अँकर निखीला म्हेत्रे, मंगेश चिवटे, हभप महादेव महाराज चाकरवाडीकर, शिवाजी महाराज नारायणगड, आमदार विजयसिंह पंडीत, आमदार विक्रम काळे, आमदार सतिष चव्हाण, कुस्तीपट्टू राहूल अवारे, यांच्यासह टीव्ही संपादक रोशन शेठ बंब, कार्यकारी संपादक प्रताप नलावडे, निवासी संपादक उत्तमभाऊ हजारे, उपसंपादक अभिजित नखाते, मुकेश झणझने, व्यवस्थापक अतुल भालशंकर सह राज्यातील अनेक दिग्गज नेत्यांसह बीड जिल्ह्यातील खासदार, आमदार व सर्व लोकप्रतिनिधींची तसेच सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, व्यापारी, पत्रकार, डॉक्टर्स, यांच्यासह सर्व स्तरातील जिल्ह्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरस्कार हा एक आनंद असतो, जो आणखी जास्त जबाबदारी देऊन जातो, असेच समजणारा मी आहे. आज लोकाशा परिवाराने मला इथे पुरस्कार देऊन सन्मानित केले या बद्दल मी पुनःछ संपादक तथा आयोजक विजयराज बंब आणि समूहाचे आभार मानतो. तरुणांनो आपल्याकडे कोरडवाहु जमिनी बरोबरच वंशपरंपरेने जिद्द, चिकाटी प्रचंड मेहनत व दूरदृष्टी या भागाने दिली आहे, तिचा योग्य ठिकाणी वापर कराल तर बीड चे सकारात्मक नाव पुढच्या एका दशकांमध्ये फक्त भारत नाही तर जगाच्या पाठीवर झळकवाल हा माझा विश्वास आहे. तसेच जिल्ह्यात नव उद्योजक घडविण्याचा आपला संकल्प असल्याचे आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त उद्योजक भरत गित्ते यांनी पत्रकार बांधवाना बोलतांना व्यक्त करतांना सांगितले.

अजितदादा पवार यांच्याकडून भरत गिते यांचे भाषनातून केले कौतुक


नंदागौळ या छोट्या खेड्यामध्ये शेतकरी कुटुंबात जन्मलेलले युवक आज एक यशस्वी उद्योगजक भारताचे ल्युमिनियम मॅन भरत गिते यांना पुरस्कार देण्यात आला. शेतकरी कुटुंबामध्ये जन्म होऊन पण, शिक्षणाचे महत्व जाणणारे व ज्यांच्याकडून उद्योगाचे बाळकडू घेतले. भरत गिते यांनी उद्योग क्षेत्रात परळीसह बीडला राज्याला देशाला नवीन ओळख करून दिल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यांच्या उद्योग क्षेत्रात कारकीर्दला त्यांनी शुभेच्छा दिल्या. परळी वैद्यनाथ तालुक्यातील नंदागौळ गावातील एका शेतकरी कुटुंबात जन्म झाला. दहावी पर्यंत शिक्षण परळीत पूर्ण केले. लातूर दयानंद कॉलेज मधून अकरावी व बारावी शिक्षण पूर्ण केले. जर्मनी येथे उद्योग क्षेत्रातील उत्कृष्टता, कौशल्यविकास व उत्पादन व्यवस्थापन शिकवले. हे सर्व काही महाराष्ट्रात आपल्या मातीसाठी, लोकांसाठी लागू करण्याच्या संकल्पनेने भारतात परत आलो. मागील दहा वर्षात पुण्यातील चाकण येथे एक सक्षम उद्योग मेक इन इंडियाच्या उपक्रमा अंतर्गत उभा करून ऊर्जा, संरक्षण, रेल्वे आरोग्य या अनेक क्षेत्रात तौरल इंडिया भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठी सेवा पुरवत आहे. देशातील उद्योग क्षेत्रात भरारी घेतली. आज त्यांच्या तौरल इंडिया प्रायव्हेट.लि. कंपनीचा हजारो कोटीचा टर्नवर आहे. हजारोच्या जवळपास कामगार काम करतात. नुकताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली डावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक गुंतवणूक परिषदेत औद्योगिक क्षेत्रात ५०० कोटींची गुंतवणूक आणि १,२०० रोजगार निर्मिती यासाठी महत्त्वाचा सामंजस्य करार करण्यात आला. म्हणून भरत गिते यांची ल्युमिनियम मॅन म्हणून ओळख निर्माण झाली असे उपमुख्यमंत्री अजितदादा म्हणाले. विमान, जहाज बांधणी, ऊर्जा, संरक्षण, रेल्वे आरोग्य अशा अनेक क्षेत्रातसाठी ल्युमिनियम पार पार्ट तयार करते. बनवलेलं पार्ट स्वीत्झर्लंड, जर्मनी, अमेरिका, इंग्लड, चायना, साऊथ कोरिया विविध देशात निर्यात होतात.भरत गिते यांच्या उद्योग क्षेत्रातील कार्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्याकडून भाषणातून तोंड भरून कौतुक केले. नवीन पिढीला त्यांनी आवाहन केले की, कष्ट करण्याची ताकत असेल तर माणूस यशस्वी होऊ शकतो काय उभ करू शकतो हे आपण भरत गित्ते यांच्या रूपाने पहिले. चुकीच्या रस्तानी जाऊ नका असे आवाहन उपमुख्यमंत्री ना. अजितदादा यांनी तरुण पिढीला केले आहे.

# टुकुर नदीवरील बंधारे करण्याचे अजितदादांचे ठोस आश्वासन

## आ. संदीप क्षीरसागर यांच्या पुढाकाराने शेतकऱ्यांचे निवेदन

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील टुकुर नदीवरील दहा ते बारा गावच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी या ठिकाणी जवळपास ९ बंधारे व्हावेत अशी मागणी या परिसरातील शेतकऱ्यांनी अजित दादा यांच्याकडे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे केली. त्यांनी हे सर्व प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी जातीने लक्ष घालून गोदावरी खोरे विकास महामंडळातून हे बंधारे पूर्ण करण्याचे ठोस आश्वासन परिसरातील गावच्या शेतकऱ्यांना दिले. बीड जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी झालेल्या आढावा बैठकीनंतर पालकमंत्री



अजितदादा पवार यांची या परिसरातील शेतकऱ्यांनी भेट घेऊन आपली मागणी निवेदनाद्वारे त्यांच्यासमोर मांडली यासाठी आमदार संदीप क्षीरसागर यांनी मध्यस्थी केली. या भेटीनंतर अजित दादा पवार यांनी या शेतकऱ्यांना हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी स्वतः प्रयत्न करीन तसेच हा प्रश्न जलसंधारण विभागाचा असल्याने गोदावरी खोरे विकास महामंडळातून याला निधी देता येईल असे सांगून त्यासाठी मी स्वतः प्रयत्न करीन आणि कुठे आडले तर मला थेट बोला शेतकऱ्याचा प्रश्न सुटला पाहिजे, असे ठोस आश्वासन अजित दादा पवार यांनी दिले.

गेल्या अनेक दिवसांपासून या टुकूर नदीवरील बंधारे व्हावे त्यासाठी बीड विधानसभेचे आमदार संदीप क्षीरसागर हे प्रयत्न करत आहेत. त्यांनी या परिसरातील नऊ कोल्हापुरी टाईप बांधणाऱ्यांचे प्रस्ताव शासनाकडे सादर केलेले आहेत मात्र त्यांना प्रशासकीय मान्यता मिळाली नव्हती आता दादांच्या माध्यमातून हा विषय मार्गी लागणार आहे. शेतकऱ्यांची यासंदर्भात वारंवार मागणी पाहता आ. संदीप क्षीरसागर यांनी मध्यस्थी करून परिसरातील गावच्या शेतकऱ्यांची थेट अजित दादा पवार यांच्याशी भेट घडवून आणली.

यावेळी दादांनी सर्व प्रश्न समजून घेऊन शेतकऱ्यांच्या अडचण समजून घेत हा प्रश्न मार्गी लावण्याचे ठोस आश्वासन दिलेले आहे. याचा पाठपुरावा करण्यासाठी आमदार संदीप क्षीरसागर यांना सूचित करण्यात आले आहे. या भेटीनंतर आमदार संदीप क्षीरसागर यांनी आपण शेवटपर्यंतचा पाठपुरावा करणार असून ज्या ज्या वेळेस शेतकऱ्यांची गरज लागेल त्या त्या वेळी सर्व शेतकरी आमदारांना पाठिंबा देतील असे आश्वासन यावेळी शेतकऱ्यांनी दिले. परिसरातील शेतकऱ्यांमधून प्रमुख १० शेतकरी प्रतिनिधींनी हा प्रश्न त्यांच्यासमोर मांडला. शिष्टमंडळामध्ये युवा कार्यकर्ते राजेंद्र आमटे, विक्रम साळुंके, सुभाष गिराम, नारायण साळुंके, विष्णू साळुंके, किशोर ढोकणे, अशोक शिंदे, संजय खुरणे, सुधाकर काकडे यांच्यासह परिसरातील ५०० शेतकरी उपस्थित होते.



# विविध घरकुल योजनेतील घोटाळेबाजांवर कारवाई करा

## माजलगाव पंचायत समिती कार्यालयासमोर प्रल्हाद दळवी व श्रीराम कोरडे यांचे आमरण उपोषण

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव पंचायत समिती मध्ये विविध घरकुल योजनांमध्ये भ्रष्टाचार व घोटाळा होतोय याला आळा बसला पाहिजे यासाठी अनेक वेळा बीडीओ यांना निवेदन देण्यात आले पण त्यांनी दखल घेतली नाही त्यामुळे पंचायत समिती कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सूरु करण्यात आले.

विविध घरकुल योजनेतील घोटाळ्यामुळे जे खरे पात्र लाभार्थी आहेत त्यांना वगळून बोगस लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ दिला जात आहे. जे अजूनही बेघर आहेत त्यांना लाभ मिळत नाही ते या भ्रष्टाचारी कारभारामुळे या लाभापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे या घोटाळेबाजांना आळा घालण्यासाठी यांच्यावर कारवाई करण्यात यावी. तसेच प्रधानमंत्री घरकुल आवास योजना ऑनलाईन घरकुलाची यादी व लाभार्थी किती. मोदी आवास योजनेचे २०२३-२४ या काळात ग्रामपंचायत लोकसंख्ये प्रमाणे किती घरकुल आले ते कोणास व कसे लाभार्थ्याला वितरीत केले. रमाई आवास योजने अंतर्गत किती लाभ दिला. शबरी आवास योजने अंतर्गत किती लाभार्थ्यांना लाभ दिला याची सर्व घरकुल योजना यांची चौकशी समिती स्थापन करून करुन योग्यती कारवाई करण्यात यावी व आम्हाला सर्व चौकशीची माहीत द्यावी.

या मागण्यांसाठी वारंवार पंचायत समिती माजलगाव यांच्याकडे तक्रार करूनही दखल घेतली जात नाही त्यामुळे प्रल्हाद आबासाहेब दळवी व श्रीराम जयराम कोरडे यांनी दिनांक ०२/०४/२०२५ पासून माजलगाव पंचायत समिती कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे.



# आष्टी येथे विश्रामग्रह ते तहसिल कार्यालय धडकणार मोर्चा

**बौद्ध गया बौद्ध विहार व विकास बनसोडे यांना न्याय देण्यासाठी भिमसैनिक मोठ्या संख्येने सहभागी व्हावे**

आष्टी । प्रतिनिधी

बूद्धगया येथील बुद्धविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे व बौद्ध युवक विकास बनसोडे यांच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी या मागणीसाठी शुक्रवार दिनांक ०४ एप्रिल रोजी होणाऱ्या भव्यदिव्य मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आष्टी तालुक्यातील समस्त भीमसैनिकांच्या वतीने करण्यात आले आहे. बुद्धगया येथील महाबुद्धविहार हे फक्त बौद्धांच्याच ताब्यात देण्यात यावे या मागणीसाठी राज्यातच नाही तर देशभर आंदोलने सुरू आहेत.

अनेक वर्षाची ही मागणी असून आता या मागणीने उद्रेक स्वरुप निर्माण केले आहे. अनेक ठिकाणी आंबेडकरी चळवळीतील नेत्यांनी लक्ष घालुन मागणी लावून धरली आहे. त्याचअनुषंगाने आष्टी तालुक्यातील समस्त भीमसैनिकांच्या वतीने देखील या मागणीचा आवाज बुलंद करण्यासाठी रस्त्यावर उतरणार आहेत. तसेच काही दिवसांपूर्वी विकास बनसोडे यांची देखील जातीय द्वेषातुन हत्या झाली असून त्या हत्येतील आरोपींना कठोर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी देखील शुक्रवार दिनांक ०४ एप्रिल रोजी सकाळी साडेअकरा वाजता मोर्चाचे आयोजन केले असून आष्टी तालुक्यातील समस्त आंबेडकरी प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन केले आहे.

आज उपविभागीय पोलिस अधिकारी (उ्रध्ड्झ) साहेब यांना त्या संदर्भात निवेदन देखील देण्यात आले आहे. यावेळी संदिप जाधव, कुणाल निकाळजे, दिपक गरुड, सुभाष निकाळजे, राहुल निकाळजे, संजय खंडागळे, नितीन निकाळजे, अविनाश भा. निकाळजे, दिपक वाल्हेकर, समीर शिरसाट, अविनाश निकाळजे, मुकेश निकाळजे आदी सर्व भिमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवकाळी पाऊस आणि गारपीटीने शेतकरी यांचे सौर पंपाचे नुकसान

गेवराई । प्रतिनिधी

वादळी पाऊस झालेल्या अवकाळी पावसामुळे भाटेपुरी येथील शेतकरी विष्णू कुंडलीक बहिर यांच्या शेतात गट नंबर.९३ सौर ऊर्जा पंपाचे मोठे नुकसान झाले आहे. गेवराई तालुक्यातील भाटेपुरी येथील झालेल्या अवकाळी पावसामुळे भाटेपुरी येथील शेतकरी विष्णू कुंडलीक बहिर यांच्या गटनंबर. ९३ सौर ऊर्जा पंपाच्या पाट्या उडुन जाऊन काही पाट्या फुटल्या आहेत तरी शेतकरी याना मदत करावी अशी मागणी शेतकरी वर्ग तुन होत आहे.



# तांदळवाडी येथे तालुक्यातील सर्व विभाग एकत्रित येऊन गावकऱ्यांसोबत भरवला ग्राम दरबार

धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील आदर्श असणाऱ्या तांदळवाडी येथे आज दि.२ एप्रिल रोजी मा. विभागीय आयुक्त यांच्या आदेशानुसार ग्रामपंचायत कार्यालय तांदळवाडी येथे एक दिवस गावाकऱ्यासोबत ग्रामदरबार हा नावीन्यपूर्ण कार्यक्रम मा.सह गटविकास अधिकारी श्री कांदे साहेब यांच्या उपस्थितीत व मा. सरपंच श्री पंडित साखरे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता.




मा.विभागीय आयुक्त यांच्या आदेशानुसार ग्रामपंचायत कार्यालय तांदळवाडी येथे एक दिवस गावाकऱ्यासोबत ग्रामदरबार हा कार्यक्रम मा.सह गटविकास अधिकारी कांदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सन्मानीय राऊत, माने, पालेकर यांच्या उपस्थितीमध्ये तालुक्यातील ग्रामपंचायत विभाग, कृषी विभाग, शिक्षण विभाग, महिला व बालकल्याण विभाग, आरोग्य विभाग, पशुसंवर्धन विभाग, पाणी पुरवठा विभाग, समाज कल्याण विभाग, स्वछता विभाग, सिंचन व जलसंधारण विभाग या सर्व विभागाच्या प्रमुखाणी उपस्थित राहून तांदळवाडी येथील ग्रामस्थांना मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदर्श ग्रामपंचायत अधिकारी श्री बाळासाहेब झोंबाडे यांनी केले व आभार आदर्श सरपंच श्री पंडित साखरे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी तांदळवाडी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्तिथ होते.

# सिरसाळ्यामध्ये लस्सी दुकानांमध्ये भेसळ: पदार्थ अन्न व औषध प्रशासनाचे दुर्लक्ष?

सिरसाळा । प्रतिनिधी

उन्हाळ्याच्या दिवसात थंडगार लस्सी पियाला अनेकांना आवडते. मात्र सिरसाळ्यातील काही लस्सी दुकानदारांमध्ये भेसळ होत असल्याची चर्चा नागरिकात होत आहे. यामुळे ग्राहकाच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. काही दुकानदार दुधात पाणी आणि काही स्टार्च मिसळत असल्याचे बोलले जात आहे. दह्यात भेसळ होत असून दुकानांमध्ये खराब दही वापरली जात असल्याचे चर्चा होत असताना दिसून येत आहे.

तसेच साखरे ऐवजी स्वस्त आणि आरोग्यासाठी हानिकारक असलेले पदार्थ वापरले जातात रंग




आणि फ्लेवर लस्सीला आकर्षक रंग आणि चव देण्यासाठी कृत्रिम रंग आणि फ्लेवर वापर केला जात आहे. ग्राहकाच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची दाट शक्यता? भेसळ युद्ध लस्सी पिल्याने ग्राहकांना अनेक आरोग्य समस्या उद्भवू शकतात यामध्ये पोटदुखी, उलट्या, जुलाब आणि इतर गंभीर आजाराचा समावेश आहे. या थंडगार लस्सी मुळे सिरसाळा येथील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाली आहे.

सिरसाळ्यातील दुकानदारावर अन्न व औषध प्रशासनाकडून कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकातून होत आहे. यामध्ये सिरसाळा भागात बाहेरून राज्यातून येऊन आपल्या लसीचा केमिकल युक्त वापर करून मोठ्या प्रमाणामध्ये लस्सीमध्ये भेसळयुक्त पदार्थाचे वापर केले जात आहे. त्यामुळे सामान्य नागरिकाला आरोग्याला समस्या अशा बरेच गोष्टींना सामोरे जावे लागत आहे. यासाठी प्रशासनाने त्वरित या दुकानदारावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी बाजारपेठेमध्ये बोलताना दिसून येत आहे.

# शेतकऱ्यांची कर्जमाफी केल्याशिवाय राज्य सरकारला सोडणार नाही : सोपान मोरे

शिरूर का. । प्रतिनिधी

निवडणुकीच्या वेळी केवळ मतांच्या राजकारणासाठी महायुतीने शेतकऱ्यांना सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते परंतु आता सरकारने त्यापासून गुमजाव केला असून शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे मात्र शेतकऱ्यांची कर्जमाफी केल्याशिवाय शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे हा पक्ष सरकारचे मनगट सोडणार नाही आठ दिवसात पिक विम्याची रक्कम शेतकरी बांधवांच्या खात्यात जमा न झाल्यास शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल तसेच वेळ पडल्यास शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास भैया गीराम शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर यांच्या माध्यमातून मुंबईतील कार्यालयामध्ये शिरल्याशिवाय राहणार नाहीत असा सरकारने इशारा शिवसेनेचा समजावा कर्जमाफी व पीक विमा संदर्भात शिवसेना आंदोलन तर नक्कीच होणार तसेच राज्याचे अर्थमंत्री अजित पवार हे कोल्हापूर दौऱ्यावर असताना त्यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार नाही असे सांगितले.



अजित पवार हे गेले अनेक वर्षे विविध मंत्रिमंडळात अर्थमंत्री म्हणून काम पाहत आहेत. त्यांना राज्याची आर्थिक परिस्थितीची खडा ना खडा माहिती आहे राज्याची आर्थिक परिस्थितीबरोबर नसताना ही निवडणुकीच्या वेळी त्यांच्यासह महायुतीच्या नेत्यांनी मग शेतकऱ्यांना कर्जमाफीचे खोटे आश्वासन का दिले याचे उत्तर त्यांनी द्यायला हवे सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे कापूस सोयाबीन उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले आहेत. कर्जमाफी बाबतच्या सरकारच्या गोंधळामुळे जिल्हा व राष्ट्रीयीकृत बँका सुद्धा अडचणीत सापडले आहेत.

कर्जमाफी होणार म्हणून शेतकरी कर्ज भरण्यास तयार नाहीत तर त्यांच्याकडून वसुलीसाठी बँका तगादा लावत आहेत नवीन आर्थिक वर्षात शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्यासाठी अनेक अडचणी निर्माण झाल्याचे त्यांना यावेळी सांगितले पिक विमा ची रक्कम अद्यापही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेली नाही. आठ दिवसात ती जमा न झाल्यास आम्ही बीड जिल्हा शिवसेनेचे संपर्कप्रमुख परशुराम जाधव व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, सुनील धांडे या सर्व वरिष्ठ नेत्यांचा आदेश घेऊन मुंबईतील पिक विमा कंपन्यांच्या कार्यालयात शिरून आंदोलन करू असा इशारा सुद्धा शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे व शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर यांनी सडकावून दिला आहे.

### वसुलीसाठी आलेल्यांना बडवा

वास्तविक शेतकऱ्यांची कर्जमाफी ही सरकारची जबाबदारी आहे. महायुतीने निवडणुकीच्या वेळी सातबारा कोरा करण्याचे केवळ आश्वासन दिले नव्हते तर जाहीरनाम्यात ते छापले सुद्धा होते मात्र आता शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जात असून वसुलीसाठी आलेल्या बँक वाल्यांना बदडून काढा असे आव्हान शिवसेनेचे सोपान काका मोरे व शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर यांनी असे आव्हान केले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT